# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ३०४/२०२५**

**विषय :- बिबटयाच्या वावराबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारातील विद्यार्थी, विद्यार्थीनीं, रहिवाशी तसेच अभ्यागतांसाठी महत्त्वाची व सतर्कतेची सूचना.**

०१. या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येत आहे की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात बिबटयाच्या वावरासंदर्भातील अफवांच्या पार्श्वभूमिवर वन विभागाशी संपर्क साधून त्यांच्याकडून माहिती घेतली असता, समाजमाध्यमावर फिरत असलेला व्हिडीओ हा सिंध कॉलनी, औंध परिसरातील असल्याची त्यांनी माहिती दिली.

०२. तरी सदर घटनेच्या पार्श्वभूमिवर विद्यापीठाकडून सर्वांना सूचित करण्यात येत आहे की, सुरक्षीततेच्या दृष्टीकोणातून सर्वांनी खालीलप्रमाणे दक्षता घ्यावी.

२.१ सूर्यास्तानंतर व सूर्योदयापूर्वी बाहेर पडणे टाळावे.

२.२ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात बिबटयाचा वावर दिसल्यास तात्काळ वन विभाग व सुरक्षा विभागाशी खालील हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा.

**वन विभाग - संपर्क क्र. १९२६**
**सुरक्षा विभाग - सुरक्षा हेल्पलाईन नं. ०२० ४८५५३३८३**
**दूरध्वनी क्र. ०२० २५६२१०००**

२.३ वन विभागाकडून अधिकृत माहिती प्राप्त झाल्यास त्याबाबत त्वरीत अवगत करण्यात येईल. त्यामुळे समाजमाध्यमांवरील कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.

२.४ बिबटयाच्या वावरासंदर्भात व्हिडीओ, फोटो यांची अधिकृत माहिती प्राप्त झाल्याशिवाय अथवा सत्यता पडताळणी केल्याशिवाय समाजमाध्यमावर कोणतीही पोस्ट करु नये, स्टेटसला ठेवू नये अथवा ग्रुपवर माहिती टाकू नये. तसेच समाजमाध्यमावर भितीदायक वातावरण निर्माण होईल असे कृत्य करु नये, असे आवाहन वन विभागाकडून करण्यात आलेले असून त्याचे पालन सर्वांनी करावे ही विनंती.

Bhosale
श्री. सुरेश भोसले,
संचालक सुरक्षा
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-०७.
सहाय्यक पोलिस आयुक्त (नि.)
पुणे शहर, गुन्हे-०१.

**गणेशखिंड, पुणे : ४११ ००७.**
**जा.क्र.सु.वि.: ३४३ /२०२५,**
**दिनांक :- २५/११/२०२५**

**<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-</u>**

०१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, } सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे ही
०२. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग } विनंती.
०३. मा. व्यवस्थापक, आय.टी. सेल - कृपया सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

D:\sahadev\circular\Circular Drafting.docx